



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com






वर्ष २ रे | अंक : ६१३ . वा | मंगळवार | दि. २८ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# ५२ अनोंदणीकृत फेरफार नियमित करणे हा टेकाळेंचा गंभीर गुन्हा...

## आता चौकशी नाही तर तात्काळ बडतर्फीची आवश्यकता

**जनसंचलन/ बुलढाणा**

महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी अवैधरित्या ५२ अनोंदणीकृत फेरफार नियमित केल्याचे व तुकडेबंदी नियमांचे उल्लंघन केल्याचे प्रकरण व त्याला वाचवण्याचे संबंधित अधिकाऱ्याचे प्रकरण यापुढील काळात चांगलेच गाजण्याची शक्यता आहे. कारण महसूल विभागात एव्हढा गंभीर गुन्हा यापूर्वी कोण्याही मंडळ अधिकाऱ्याने केलेला असण्याची अजिबात शक्यता नाही. विशेष म्हणजे एव्हढा गंभीर प्रमाण होऊन सुद्धा विजय दत्तात्रय टेकाळे यांना सातत्याने तहसीलदारांपासून ते महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी सातत्याने वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. बाकी मंडळ अधिकाऱ्यांना एक न्याय तर दुसऱ्यांना दुसरा न्याय असा प्रकार सध्या महसूल विभागात सुरू असल्याने या प्रकाराची मोठी चर्चा महसूल विभागात होतेय. मंडळ अधिकारी टेकाळे यांनी आपल्या शासकीय सेवाकाळात कायद्याची व नियमांची कशाप्रकारे वासलात काढली व कशाप्रकारे अनेक अवैध कामे करून त्यांनी स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे, याबाबत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने तपशीलवार खुलासे करीत आहे. आता टेकाळे यांनी ५२ अनोंदणीकृत फेरफार नियमित केल्याचा तसेच तुकडेबंदी तरतुदींचे उल्लंघन केल्याचा आणखी एक प्रकार उघडकीस आला आहे. यापूर्वी सातत्याने टेकाळे यांना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांना सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या रेट्यामुळे आता बळेबळेच चौकशी करण्याचे तरी आदेश द्यावे लागले आहेत. त्यानुसार तत्कालीन उपविभागीय अधिकारी अभिजित नाईक यांनी बुलढाणा तहसीलदारांना ५२ अनोंदणीकृत फेरफार नियमित करणे व त्यामध्ये तुकडेबंदी नियमांचे उल्लंघन केल्याच्या संदर्भातील चौकशीचे आदेश बुलढाणा तहसीलदारांना दिले होते. बुलढाणा तहसीलदार तर या प्रकरणी सातत्याने टेकाळे यांना वाट्टेल त्या थराला जाऊन वाचवण्याचे काम करीत आहेत, हे यापूर्वीही सिद्ध झालेले आहे. कारण या प्रकरणी टेकाळे यांना वाचवण्यासाठी तहसीलदार बुलढाणा यांनी चौकशीची सूत्रे ही निवासी नायब तहसीलदारांकडे सुपूर्द केली. यातून एक प्रकारे तहसीलदारांनी स्वतः ची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला होता. खरेतर अशा प्रकरणात दोषी अधिकाऱ्याची चौकशी करण्यासंदर्भात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घेणे व पुराव्यांची जुळवाजुळव करणे अपेक्षित असते. मात्र, या प्रकरणी सातत्याने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची बोटचेपी भूमिका माहिती असल्या कारणाने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने स्वतःहून या ५२ अनोंदणीकृत फेरफाराच्या नकला कागदपत्रांसह सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. खरेतर

**बहुचर्चित असलेले मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळेंचे नियमबाह्य कामे व शेकडो सातबारें आता पर्यंत झालेल्या तक्रारी व त्याची काढलेली निकशे बुलडाणा एसीबी गोपनीय चौकशी अंती मिळालेली माहिती ? ह्या संपूर्ण प्रकरणाची पोलखोल पुढील प्रत्येक सत्रात**

टेकाळे यांनी केलेला हा गुन्हा अत्यंत गंभीर आहे. परंतु तरीही निवासी नायब तहसीलदारांनी चौकशी करताना टेकाळे यांचा बचाव करण्यासाठी ५२ बेकायदेशीर अनोंदणीकृत फेरफारांचे मूळ फेरफार पुस्तकांसोबत तपासणीच केली नाही, हे सिद्ध झालेले आहे. याचे आज सज्जड पुरावे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजकडे प्राप्त आहेत. या संपूर्ण प्रकारामुळे हे स्पष्ट होते आहे की, महसूल विभागाचे अधिकारी आज वाट्टेल त्या थराला जाऊन एक महाभ्रष्टाचारी अधिकारी टेकाळे यांना वाचवण्याचा आटापीटा करीत आहेत. अशाच प्रकारचा गैरप्रकार मेहकर तालुक्यातील हिवरा बुद्रुकचे तत्कालीन मंडळ अधिकारी साळवे यांनी केल्याचे समोर आल्यानंतर त्याची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीने त्यांना दोषी ठरवले व त्यांच्यावर कारवाई केली. परंतु महसूल विभागात एका भ्रष्टाचाऱ्याला एक न्याय आणि दुसऱ्या भ्रष्टाचाऱ्याला दुसरा न्याय, असा प्रकार आहे. टेकाळे यांनी कितीही गंभीर गुन्हे केले, त्यांनी




नेहमी चर्चेत असणारे मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे बडतर्फ प्रकरण

**टेकाळेंची बदली नको, बडतर्फीच हवी :तक्रारकर्त्यांची मागणी**

कितीही गैरव्यवहार, कितीही भ्रष्टाचार केला, कितीही करोडो रुपयांची अपसंपदा जमवली, तरी त्यांच्यावर कारवाई करायची नाही, असा चंग महसूलच्या अधिकाऱ्यांनी बांधल्याचे दिसते. महसूल विभागातील अधिकारी एव्हढे लाचार आणि मजबूर का झालेले आहेत हे समजायला मार्ग नाही. टेकाळे यांच्यासोबत इतर अधिकारी देखील भ्रष्ट बनले असावेत किंवा टेकाळे यांच्या अवैध अपसंपदेमध्ये त्यांचाही वाटा असावा, असा संशय सध्या सामान्य जनतेला येऊ लागला आहे. काहीही असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जोपर्यंत टेकाळे व महूल विभागातील इतर भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना कायद्याचा हिसका दाखवत नाही, तोपर्यंत शांत बसणार नाही.

# पत्रकार गोपाल तुपकर यांच्या कुटुंबीयांवर हल्ला करणाऱ्या व धमकवणाऱ्यांना तडीपार करा चिखली तालुका पत्रकार संघाची मागणी...

**जनसंचलन/चिखली**

दैनिक पुण्यनगरीचे प्रतिनिधी पत्रकार गोपाल तुपकर यांचे पुतणे शुभम तुपकर यांच्यावर हल्ला करून त्यांच्याकडून रोख रक्कम पळवण्याचा व तक्रार मागे घेण्यास साठी घेण्याचा दबाव आणून धमकी देणाऱ्यांवर तडीपारची कारवाई करावी अशी मागणी चिखली तालुका पत्रकार संघाच्या वतीने ठाणेदार संग्रामसिंह पाटील यांना करण्यात आली आहे दि. २७ नोव्हेंबर रोजी या मागणी-चे निवेदन पत्रकार संघातर्फे ठाणेदार पाटील यांना देण्यात आले.

पत्रकार गोपाल तुपकर यांचे पुतणे शुभम तुपकर यांना चार-पाच दिवसांपूर्वी मेकर फाट्यावरून चिखलीकडे येताना रात्रीच्या प्रसंगी रस्त्यात अडवून मारहाण करण्यात आले व त्यांच्याकडील रोख रक्कम पळवल्या गेली या घटनेतील आरोपींवर ठाणेदार संग्राम से पाटील यांनी तातडीची कारवाई करून त्यांना अटक केली. ठाणेदार पाटील यांच्या या वेगवान तपास कार्याबद्दल पत्रकार संघाने समाधान व्यक्त केले आहे. परंतु त्यांच्या या कठोर कारवाईमुळे या समाजकंटकांचे पित्त खवळले व त्यांनी पोलीस कारवाईची बातमी वर टाकल्यामुळे गोपाल तुपकर यांचे दुसरे पुतणे गौरव तुपकर याला धमकावून सदर बातमी डिलीट करण्यास व तक्रार मागे घेण्यास घेण्यात सांगितले. तसे न केल्यास त्याला मारहाण करण्याची धमकी देखील दिली.

चिखली शहरात वाढत असलेल्या या गुंडशाही प्रवृत्तीला ठाणेदार संग्रामसिंह पाटील हे जरब बसवत आहेत, ही नागरिकांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे, याच पार्श्वभूमीवर तुपकर कुटुंबाला सतत धमक्या देणाऱ्या व कायद्याचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या सदर समाजकंटकांवर आपण कठोर कायदेशीर कारवाई करून गुन्हेग-ारी प्रवृत्ती असणाऱ्या या गावगुंडाचा तडीपारीचा प्रस्ताव तयार करावा आणि पत्रकारांच्या कुटुंबांना आणि सर्वसामान्य नागरिकांना देखील सुरक्षा देण्याबाबत आश्वासित करावे अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावर चिखली तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश शर्मा उपाध्यक्ष कमलाकर खेडेकर सचिव तौफिक अहमद यांच्यासह संतोष लोखंडे, कैलास शर्मा, रेणुकादास मुळे, कैलास गाडेकर, इफ्तेखार खान, छोटु कांबळे, रवींद्र फोलाने, नितीन फुलझाडे, इमरान शहा, साबीर शेख, सैय्यद साहिल, भारत जोगदंडे, राजू सुरडकर आदी सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बनमेरू विज्ञान महाविद्यालयास नॅक मूल्यांकनात बी++ ग्रेड

**जनसंचलन/ लोणार**

लोणार येथील कै. कु. दुर्गा क बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार, जिल्हा बुलढाणा या महाविद्यालयास नॅक मूल्यांकन द्वितीय चक्र प्रक्रियेमध्ये २.८८ सी जी पी ए तथा बी++ ग्रेड मिळविला आहे. पश्चिम विदर्भातील ग्रामीण भागातील लोणार तालुक्यातील एकमेव विज्ञान शाखेचे बी ++ ग्रेड मिळवणारे बनमेरू विज्ञान महाविद्यालयाने एक मानाचा तुरा रोविला आहे. या नॅक मूल्यांकन प्रक्रिये दरम्यान नॅक (एन.ए.ए.सी) बेंगलुरु यांचे तर्फे तीन सदस्य समिती मध्ये प्रा. एम. भास्कर, प्र-कुलगुरू, श्री व्यंकटेश्वर युनिव्हर्सिटी तिरुपती, प्रा. एन राजलिंगम, सुंदरनार युनिव्हर्सिटी, तमिळनाडू व प्राचार्य अब्दुलरहमानी ओलापिलन, मॅमपॅड कॉलेज, मलापुरम, केरळ या मूल्यांकन समितीने महाविद्यालयास दिनांक १७ व १८ नोव्हेंबर २०२३ रोजी भेट देऊन विविध शैक्षणिक व भौतिक सुविधांची तपासणी करून मूल्यांकन प्रक्रिया पार पाडली. या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.



तसेच अमृत सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय सौ. उषा गोले व सचिव सन्माननीय डॉ. संतोष बनमेरू व सर्व सन्माननीय व्यवस्थापन पदाधिकारी यांनी पाठबळ देऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेऊन मूल्यांकन प्रक्रियेस सामोरे गेले. या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, तसेच पालक वर्ग व इतर सर्व संबंधित घटकांचे मोलाचे सहकार्य लाभले. एकूणच पश्चिम विदर्भात महाविद्यालयाच्या प्रगतीचा ठसा या घवघवीत यशाने परिसरात उमटला आहे. या प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू, नॅक समन्वयक प्रा. शारीक शेख, आयक्यूएसी समन्वयक डॉ. महेंद्र भिसे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी या सर्वांचे मोलाचे योगदान लाभले.

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने श्री गुरूनानक देव जयंती व त्रिपुरारी पोर्णिमा निमित्त भव्य दिव्य दीपोत्सव साजरा

**जनसंचलन/ खामगाव**

स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा श्री गुरू नानक देव जयंती व त्रिपुरारी कार्तिक पौर्णिमा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन दिं २६ नोव्हें व २७ नोव्हे करण्यात आले होते. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्ना भाऊ शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २३ वर्षा पासून मंडळाच्या माध्यमातून धार्मिक व अनेक सामाजिक उपक्रम निस्वार्थ अखंडपणे सुरू आहेत या मध्ये आज त्रिपुरारी पोर्णिमा या दिवशी भगवान शंकराने त्रैलोक्याला त्रास देणाऱ्या त्रिपुर राक्षसाची तीन पुरे जाळून त्याला ठार केले म्हणून या पोर्णिमेला त्रिपुरी किंवा त्रिपुरारी पोर्णिमा असे म्हणतात या दिवशी रात्री घरात, घराबाहेर, देवळात, शिवालयात, गंगेच्या तिरावर दिवे लावतात व दिपदान करावे, गंगा स्नान करावे आणि कार्तिक स्वामी चे दर्शन घ्यावे असा विधी आहे त्रिपुरारी पोर्णिमा चे औचित्य साधुन दिं २६-११-२०२३ रविवार रोजी संध्याकाळी ६-३० वा ओंकारेश्वर मठ येथे महाआरती करून नंतर भव्य दिव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. नंतर प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची



सांगता करण्यात आली. तसेच दिं २७-११-२०२३ रोजी सकाळी १० वा रमेश सरोदे यांच्या घरी श्री गुरू नानक देव यांची ५५४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली महाआरती करून महाप्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी नरेंद्रभाऊ मावळे,रमेशकाका सरोदे,लक्ष्मणराव गाडे, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा. दिलीप झापर्डे. अजय सारसर,लालाजी सांगळे. अशोक आनंदे.नंदु बरदिया,दिपक तांबे,सचिन केवारे,पापा मुक्ते,गोपाल लाड, गजानन उंबरकर,सागर चुंबळकर,राजपाल यादव, निलेश डोंगरकर, दिनेश डोंगरकर,प्रकाश जोगदंड,अशोक मोरे, फुलारे काका, राजु ईगळे,विनोद महाडिक,मोरे,आशाबाई अंधारे. मंगला बाई बावस्कर. शकुंतला बाई ढवळे. जयश्री झापर्डे. वर्षाताई देशमुख ,पुष्पा बाई सरोदे,बेबी आवलकर,प्रमिलाबाई शिंदे,सोनाली शिंदे,निकिता पवार,आरूषी भोसले,जान्हवी डोंगरकर,अंजली पवार,ज्योती डोंगरकर,सुनिता साळुंखे, पुजा डोंगरकर,कामिनी शिंदे,विद्या शिंदे,माला ससे,मोनु खोडे,गुड्डी ताई पवार, विद्याताई पवार,पुष्पाबाई गिड्डे,प्रिती भोसले,वैशाली कोडलिंगे,जान्हवी शर्मा, पुजा लाड,ऊषा शर्मा,प्राची कोडलिंगे, किर्ती शर्मा,सुनिता बोचरे,तसेच शिवाजी नगर. सतिफैल भागातील शेकडो महिला पुरूषांची उपस्थिती होती अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली.

# अजिसपुर येथील रस्त्यावरील व शासकीय जागेवरील अतिक्रमण हटावा: अन्यथा पं स. समोर आमरण उपोषणाचा इशारा...

**जनसंचलन/ लोणार**

अजिसपुर येथील रस्त्यावरील व शासकीय जागेवरील अतिक्रमण हटवण्यात यावे अन्यथा लोणार पंचायत समिती समोर गावकऱ्यांना सोबत घेत आमरण उपोषण करण्याचा इशारा अजीसपुर येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष अंबादास कुलाळ यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती लोणार यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे

मौजे अजिसपुर गावांमध्ये मोठ्या प्रमाणात गावातील नागरीकांनी अवैधरित्या शासकीय जागेवर अतिक्रमण करून कोणी पक्के तर कोणी कच्चे बांधकाम केले आहे तसेच आज रोजी जो तो शासकीय जागेवर अतिक्रमण करून तसेच घराच्या मुळ जागा सोडुन पुढे नालीवर बांधकाम करून अतिक्रमण करीत आहेत त्याच प्रमाणे आज रोजी सुरू असलेल्या जलजिवन मिशन काम सुरू असुन संबंधीत ठेकेदारांनी पाईप लाईन करीता खोदकाम केले आहे परंतु अदयाप पर्यंत रस्त्यावरील मटेरीयल उचलले नसल्याने नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हे सर्व दिसत असतांना सुध्दा ग्रामपंचायत सरपंच व सचिव मात्र याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करून नागरीकांना वेठीस धरण्याचे काम करीत आहे. तेव्हा या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आपण तात्काळ मौजे अजिसपुर गावामध्ये असलेले अवैध अतिक्रमणाची पाहणी करून तात्काळ अतिक्रमण हटविण्यात यावे तसेच रस्त्यावरील मटेरीयल काढुन घेण्याची कार्यवाही करावी अन्यथा मला १५ दिवसानंतर लोकशाही मार्गाने अवलंब करून आमरण उपोषण करावे लागेल. असाही इशारा निवेदनाअंती दिला आहे जिल्हाधिकारी साहेब,



जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं) जिल्हा परिषद, बुलडाणा उपविभागीय अधिकारी, महसुल मेहकर तहसीलदार साहेब, तहसील कार्यालय लोणार सहसंबंधित विभागास देण्यात आल्या आहे.

# आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे शेतकऱ्यांच्या बांधावर..!



**जनसंचलन/बुलढाणा**

आस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीची आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे साहेब यांनी पाहणी केली. सिंदखेडराजा मतदारसंघातील अनेक भागांमध्ये शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्याबाबतची शासकीय आकडेवारी तसेच शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत शासनाकडून मदत पोहचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत तसेच शासकीय अधिकाऱ्यांनी सुद्धा त्या पद्धतीने कामाला लागावे अश्या सूचना यावेळी त्यांनी उपस्थित कृषी विभागातील अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच येत्या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी याकरिता पुरेपूर प्रयत्न करणार आहे. शासन आणि आम्ही सदैव शेतकऱ्यांच्या सोबत आहोत असा विश्वास याप्रसंगी त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दे.माळी येथे कुस्त्यांची भव्य दंगल संपन्न

## एक लाख रुपये बक्षीसाची करण्यात आली जंगी लूट



**जनसंचलन/मेहकर**

लाल मातीतला खेळ, महाराष्ट्राचा अभिमान असणारा कुस्ती हा खेळ सध्या इंटरनेटच्या या युगात लोप पावत चालला आहे. पण बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी अस एक गाव आहे की, येथे आजही कुस्ती हा क्रीडा प्रकार खेळला जातो. नुसता खेळला जात नाही तर त्याची जोपासना सुद्धा करण्यात येते. दरवर्षी शेकडो मल्ल यात (मुली सुद्धा कमी नाही) किसन बळी यांच्या नेतृत्वात क्रांतीसुर्य तालीम संघात तयार होऊन महाराष्ट्रात विविध ठिकाणी नाव गाजवतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य कार्तिक यात्रा महोत्सव निमित्य श्री.पांडुरंग संस्थान आयोजित क्रांतीसुर्य तालीम संघाच्या सहकार्याने भव्य कुस्त्यांची आमदंगल पार पडली. या दंगलीमध्ये एक लाख रुपये बक्षीसाची जंगी लूट करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मेहकर तहसीलचे तहसीलदार निलेशजी मडके यांची उपस्थिती लाभली. तर प्रमुख पाहुणे म्हणून मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.संजय रायमुलकर, सरपंच किशोर गाभणे, पांडुरंग संस्थानचे अध्यक्ष बाबुराव बळी, व आदी पदाधिकारी यांची उपस्थिती लाभली. भव्य कुस्त्यांच्या आमदंगलीमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस जगदीश राजपूत या मल्लाने पटकवले. हे बक्षीस पी.ई.पाटील नेत्ररोग तज्ञ मेहकर यांच्या वतीने प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांक जयसिंग राजपूत या मल्लास प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अनिल कुमार गाभणे यांच्या वतीने देण्यात आले. तृतीय क्रमांक शिवा मोरे जालना यांना डॉ.केशव अवचार अध्यक्ष तुळजाई अर्बन बँक यांच्या वतीने देण्यात आले. तर चौथा क्रमांक विनोद पहिलवान वाशिम एडवोकेट भगवान भराड यांच्या हस्ते देण्यात आले. पाचवा क्रमांक शुभम गत्ते तळणी या पैलवानास पांडुरंग संस्थानचे विश्वस्त सखारामजी मगर, सहावा क्रमांक युवराज जाधव वाशिम यास पुंडलिक मगर माजी सैनिक, सातवा क्रमांक सिद्धू आंधळे पिंपरी आंधळे यांना जिल्हा तालीम संघाचे सचिव सारंग परदेशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर या कुस्त्यांच्या आम दंगलीमध्ये महिला पहिलवानांनी सुद्धा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. महिला पैलवानांच्या कुस्त्या या दंगलीमध्ये प्रामुख्याने आकर्षण ठरल्या. महिला कुस्त्यांचे आयोजन हर्षल मेडिकल एजन्सीचे अमोल मगर यांनी केले होते. महिलांच्या कुस्तीमध्ये सुद्धा एकवीस हजार रुपयांच्या बक्षाची जंगी लूट करण्यात आली. प्रत्येक विजेता पैलवान यास कलाविष्कार फाउंडेशन तर्फे स्वर्गीय साहशी वीर विजू मल्ल सुरुशे यांच्या स्मृती प्रित्यर्थ रवींद्र वानखेडे अध्यक्ष कलाविष्कार फाउंडेशन व त्यांचे सहकारी तथा क्रांतीसुर्य तालीम संघाच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. या कुस्ती स्पर्धे साठी प्रोत्साहन पर आमदार डॉ.रायमूलकर , सरपंच किशोर गाभणे,प्राचार्य बाहेकर ,आडे ठेकेदार,ज्ञानेश बळी ,लंगोटी यार मित्र मंडळ,संत सावता माळी व शिव सावता मित्र मंडळ यांनी आर्थिक मदत केली. कुस्ती दंगलीमध्ये पंच म्हणून गणेश गाभणे, संजय बोरकर, दत्ता तायडे, विशाल मगर, रवींद्र पुरी, गणेश गिरे, यांनी काम पाहिले. तर प्रशासकीय व इतर काम कुंडलिक मगर, हरी पाटील, रवी मगर पाटील, अरुण बळी, विजय मगर (गोवा), बालू वाघमारे, गोलू मत्ते, नितीन भराड, राहुल गवई, पंकज लोणकर, रोहिदास डोंगरे, यांनी केले. या कुस्ती दंगलीचे विमोचन टी .एल.मगर यांनी केले. भव्य अशा या कुस्त्यांच्या दंगलीमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेश शिंगटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनचे कर्मचारी राम रिंढे, दे.माळी सर्कलचे बीट जामदार, व आदी पोलीस कर्मचारी यांनी बंदोबस्त ठेवला. तर आभार प्रदर्शन क्रांतीसुर्य तालीम संघाचे अध्यक्ष किसन बळी यांनी मानले. भव्य कुस्त्यांच्या आमदांगलीला गावकरी व तालुकाभरातून प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

# सामाजिक लोकशाहीसाठी संविधानाची गरज- सुनील शेळके

## संविधान दिन : ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे आयोजन




**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक लोकशाही हा जीवनमार्ग आहे. तर स्वातंत्र्य, समता, बंधुता ही जीवनतत्वे आहेत. राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिजे, हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार रुजवण्याकरिता आणि सामाजिक लोकशाहीसाठी संविधान गरजेचे आहे, असे प्रतिपादन ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे संस्थापक सुनील शेळके यांनी केले. संघटनेच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. मंचावर जिल्हा नियोजन अधिकारी सुनय लाड, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा समन्वयक प्रमोद टाले, ॲड. सुभाष विणकर, शाहीर के. ओ. बावस्कर, संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना सुनील शेळके म्हणाले, संविधानाने भारतीय नागरिकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. प्रत्येकाने संविधानाचा आदर केला पाहिजे. समाजाच्या कल्याणासाठी झटणाऱ्या महामानवांना अभिवादन करुन आज ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्यावतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधान जनजागृतीसाठी संघटना कटिबद्ध आहे. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा समन्वयक प्रमोद टाले यांनी संविधान सभा गठन व त्यावेळी आलेल्या अडचणींवर मत व्यक्त केले. ज्येष्ठ अधिवक्ता सुभाष विणकर यांनी संविधानाची ओळख व कलमांचे महत्व यावेळी सांगितले. शाहीर के. ओ. बावस्कर यांनी संविधानाचे गीत गात पोवाडा सादर केला. संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे यांनी सामाजिक न्यायाच्या अनुषंगाने संविधानाचे महत्व विशद केले. विविध सामाजिक संघटना तसेच शहरातील पतसंस्थेचे पदाधिकारी व सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती. संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन अनिल पवार यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी केले. संचलन संजय खांडवे यांनी तर आभार मुरलीधर टेकाळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गजानन राऊत, उदय देशमुख, योगेश महाजन, सतीश राजपूत, राहुल बाजारे, संदीप सावळे, अनिल पडोळकर, केशव भोलाणे, नीतेश साखरे, प्रवीण चिंचोले, शुभम शिरसाट यांनी परिश्रम घेतले.

# सिंदखेडराजा परिसरात अवकाळी पाऊसाने घातला थैमान...

## वन बुलडाणा मिशनचे संदीपदादा शेळके शेतकऱ्यांच्या बांधावर पीक नुकसानीची पाहणी करून शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

जिल्ह्यात रविवारी रात्री झालेल्या अवकाळी पावसाने पिकांना प्रचंड फटका बसला. शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झाले. सिंदखेड राजा तालुक्यात अवकाळीने प्रचंड नुकसान झाले. वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीपदादा शेळके यांनी सोमवारी सकाळी या परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचत नुकसानाची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अवकाळीने हिरावला असून शासनाने तत्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. २६ नोव्हेंबरच्या रात्री १० वाजेपासून सुरू झालेला पाऊस रात्रभर धो- धो पडत राहीला. या पावसाने सिंदखेडराजा परिसरातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. संदीपदादा शेळके यांनी सिंदखेड राजासह, असोला, पळसखेड चक्का, बोराखेडी बावरा तसेच सिंदखेडराजा तालुक्यातील अनेक गावांत थेट बांधापर्यंत जाऊन पाहणी केली. या नुकसानीचे पंचनामा करून राज्य सरकार तुटपुंजे सानुग्रह अनुदान देईल. एवढ्याशा मदतीने शेतकऱ्यांना काहीच फायदा होणार नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने न पुसता योग्य प्रमाणात नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. असोला येथील ग्रामकल्याण फार्मर प्रोड्युसर कंपनीचे शेडनेटमध्ये ठेवलेले सोयाबीन सीड पावसाने भिजले. तर वादळी वाऱ्यामुळे याच गावातील अनेक घरांवरील टिनपत्रे उडाले. टिनपत्रे उडाल्याने शेतकऱ्यांच्या घरातील कापूस भिजला. किराणा सुद्धा भिजला. त्यामुळे असोला येथील वन बुलढाणा मिशनच्या कार्यकर्त्यांनी काही घरात किराणा सामान किटचे वाटप करुन मदतीचा हात दिला. पळसखेड चक्का या एका गावात शेडनेट लावलेले जवळपास १०० शेतकरी आहेत. अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेडनेटमध्ये लावलेले टोमॅटो, वांगी, मिरची आदी पिकांचे प्रचंड नुकसान झाले.



शेडनेट उभारणीसाठी लाखो रुपयांचा खर्च येतो. राज्य, केंद्र सरकार शेडनेटला नुकसान भरपाई देत नाही. पाच- दहा हजारांचे सानुग्रह अनुदान देऊन जमणार नाही. शेतकऱ्यांना तत्काळ योग्य प्रमाणात नुकसान भरपाई देण्याची मागणी संदीपदादा शेळके यांनी केली.

# राष्ट्रवादी काँग्रेस फक्त मराठ्यांचा पक्ष, भुजबळ साहेब तुम्ही राजीनामा द्या, समर्थक आक्रमक



वृत्तसंस्था/पुणे

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी पक्षाचा राजीनामा द्यावा आणि वेगळी संघटना स्थापन करावी अशी मागणी बहुजन विकास संघटनेचे बाळासाहेब कापरे यांनी केली आहे. त्यासोबत भुजबळांच्या संरक्षणासाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते हे पुण्यातल्या शासकीय विश्रामगृह बाहेर एकटवले आहेत. पुण्यात फुले वाडा येथे समता भूमीचा कार्यक्रम छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे त्यापार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून समर्थकांनी ही भूमिका घेतला असल्याचं सांगण्यात आलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ हे आरक्षणाचा मुद्द्यावर आक्रमक झाले असून त्यांना रोज जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. काल पुण्यातल्या शासकीय विश्रामगृह येथे त्यांचा मुक्काम होता. त्यादरम्यान स्वराज संघटनेच्या धनंजय जाधव यांनी शासकीय विश्रामगृहत येऊन माध्यमांसमोर भुजबळ यांचा गाडी फोडण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला होत. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मोठा बंदोबस्त विश्रामगृह येथे लावलेला पाहायला मिळत आहे. सोबतच समर्थक ही मोठ्या संख्येने एकवटले आहेत.बाळासाहेब कापरे म्हणाले की, काल स्वराज्य संघटने काल भुजबळ साहेबांवर हाल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्या निषेधार्थ आम्ही येथे आलो आहोत. भुजबळ साहेबांना कोणी हात लावला किंवा कोणी बोलण्याचा प्रयत्न केला तर त्याला प्रतिउत्तर देण्यासाठी आम्ही एकवटलो आहेत. आणि भुजबळ साहेबांनी आता महाराष्ट्रातल्या सगळ्या १८ पगड जातींसाठी पक्ष काढावा, आणि या सर्व समजाला न्याय द्यावा अशी मागणी करण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. आणि याबाबतच निवेदन ही आम्ही त्यांना देणार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा त्यांनी राजीनामा द्यावा कारण राष्ट्रवादी ही फक्त मराठ्यांची संघटना आहे. तिथे इतर कुठल्या समजाला प्राधान्य दिलं जातं नाही. म्हणून साहेबांनी बहुजन करता पक्ष काढून न्याय द्यावा अशी सर्व समर्थकांची मागणी आहे असे बाळासाहेब कापरे म्हणाले.

# ठाकरेंची लोकसभा रणनीती ठरली, राऊतांकडे डझनभर मतदारसंघांची धुरा, राष्ट्रवादीशी संबंधित जागांचा समावेश...



वृत्तसंस्था/मुंबई

शिवसेनेमध्ये फूट पाडत एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांच्या मदतीने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला धक्का दिला. त्यानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकांना सामोरी जाणार आहे. साहजिकच या निवडणुकीसाठी ठाकरे गटाने रणनीती आखली असून, पक्षाच्या १० नेत्यांवर राज्यातील विभागवार संघटनात्मक विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अलिकडेच उद्धव ठाकरे यांनी पक्षातील नेत्यांची संख्या वाढवली होती. आता त्याच नेत्यांवर लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, पश्चिम आणि पूर्व विदर्भ या ठिकाणच्या संघटना बांधणीची जबाबदारीही यानिमित्ताने सोपविण्यात आली आहे. पक्षात फूट पडल्यानंतर आता पुन्हा पक्षाला उभारी देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी राज्यातील संघटनात्मक बांधणीवर भर देण्याचे ठरवले असून, त्यानुसार नेत्यांची विभागवार यादी जाहीर केली. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या दहा नेत्यांवर राज्यातील विभागवार संघटनात्मक, तसेच आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने विशेष जबाबदारी सोपवली आहे. त्यानुसार संजय राऊत यांच्याकडे उत्तर महाराष्ट्र आणि पुण्याची जबाबदारी सोपविताना नाशिक, दिंडोरी, जळगाव, रावेर, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, शिर्डी, पुणे, बारामती, शिरुर, मावळ या लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. माजी केंद्रीय मंत्री अनंत गिते यांच्याकडे कोकणाची जबाबदारी देताना रायगड, मावळ लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी दिली आहे. तर चंद्रकांत खैरे यांच्याकडे मराठवाडा देताना जबाबदारी देताना संभजीनगर आणि जालना या लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी दिली आहे. खासदार अरविंद सावंत यांच्याकडे पश्चिम विदर्भ देताना बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी दिली आहे.खासदार अनिल देसाई यांच्याकडे पश्चिम महाराष्ट्र सोपविताना सातारा, माढा, सांगली, कोल्हापूर आणि इचलकरंजी मतदारसंघाची जबाबदारी दिली आहे. आमदार सुनील प्रभू यांच्याकडे सोलापूर, धाराशीव, लातूर बीड या मतदसंघांची तर आमदार भास्कर जाधव यांच्याकडे नागपूर, रामटेक, भंडारा गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. खासदार विनायक राऊत यांच्याकडे रत्नागिरी, सिंधुदुर्ग, खासदार राजन विचारे यांच्याकडे ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर तर आमदार रवींद्र वायकर यांच्याकडे नांदेड, हिंगोली आणि परभणी मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.दरम्यान, आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी ठाकरे गटाचे राज्यव्यापी शिबीर जानेवारी महिन्यात होणार आहे. शिवाय जानेवारीत उद्धव ठाकरे यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचेही नियोजन करण्यात येणार आहे.संजय राऊत यांच्याकडे जवळपास डझनभर लोकसभा मतदारसंघांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मात्र या मतदारसंघांमध्ये प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित असलेल्या पुणे, बारामती, शिरुर तसेच मावळ या लोकसभा मतदारसंघाचा समावेश असल्याकडे, तसेच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि संजय राऊत यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांकडे पक्षातीलच एका ज्येष्ठ नेत्याने लक्ष वेधले. शिवाय या जबाबदाऱ्या सोपविताना पहिल्यांदाच सुभाष देसाई यांना वगळण्यात आल्याचेही या नेत्याने सांगितले. सुभाष देसाई हे शिवसेना भवनमध्ये बसून या सर्व मतदारसंघांशी संबंधित प्रक्रियेवर लक्ष ठेवणार असल्याचेही समजते.

# जिल्ह्यात शेतकऱ्यांची चिंता वाढली, दाट धुक्यामुळे हरभरा गहू पिकावर रोगराई पसरण्याची शक्यता, शेतकरी चिंतेत



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात आज सकाळी दाट धुक्याची चादर पसरली. वातावरणात गारवा वाढल्याने थंडीपासून बचावासाठी शेकोट्या पेटल्या. धुक्यामुळे वाहनांचा वेगही मंदावला होता. गुलाबी थंडी, दाट धुके आणि दवबिंदु असे मनमोहक वातावरण नगरकरांनी आज अनुभवले. बुलढाणा जिल्ह्यात असलेल्या ग्रामीण परिसरात आज पहाटे सर्वत्र दाट धुक्याची चादर पसरली होती. या धुक्यामुळे रब्बी पिकावर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी वर्तवली असून या हंगामात येणाऱ्या हरभरा, ज्वारी, गहू या पिकांवर धुक्याचा परिणाम पडण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात ढगाळ वातावरणामुळे रब्बी पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांवर आता या धुक्यामुळे पुन्हा संकट आलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958